॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ६१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

**✲ सुविचार ✲**

जग सुंदर आहे, फक्त पाहण्याचा दृष्टिकोन सुंदर असावा!

## फोडणी

राजू घुगरे, शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### शिक्षक- बँक

गोंधळातच सुरु होतो
अंक दुसरा असो की पहिला
सर्वसाधारण फरक नाही
सत्तेत पुरुष आहे की महिला
दरवर्षी तीच ती भांडणे
सारी नितीमुल्ये तुडवून
ठेवीवर मिळतेच व्याज
पण शिक्षकप्रतिमा बुडवून

## SPOT NEWS

### अमरनाथ यात्रा स्थगित

● **नवी दिल्ली** – अमरनाथ यात्रा संपण्यास काही आठवडे बाकी असतानाच स्थगित करण्यात आली आहे. प्रतिकूल हवामान आणि भाविकांच्या संख्येत झालेली लक्षणीय घट यामुळे अमरनाथ यात्रा स्थगित करण्याचा निर्णय घेतल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. यंदा ४.७ लाखांहून अधिक भाविकांनी अमरनाथचे दर्शन घेतले. बहुतांश भाविक यात्रेच्या पहिल्या तीन आठवड्यांत आले होते, मात्र २३ जुलैपासून भाविकांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे. भाविकांची संख्या अत्यंत कमी झाल्यामुळे यात्रा स्थगित करण्यात आली आहे. रविवारी जम्मूवरून भाविकांची कोणतीही नवीन तुकडी आली नाही. तसेच हवामानाबाबत इशारा देण्यात आला असून, मार्गावरील दुरुस्तीचे कामही करणे आवश्यक आहे. त्यामुळे यावर्षीची यात्रा आता संपली आहे, असे आपण म्हणू शकतो, असे कश्मीरचे विभागीय आयुक्त अंशुल गर्ग यांनी सांगितले.

### आ. जयंत पाटील यांचा मुख्यमंत्र्यासोबत प्रवास

● **मुंबई** – मतदारसंघ पुनर्रचना विधेयक पुन्हा एकदा लोकसभेत मांडण्यासाठी एनडीएकडून फोडाफोडीचे सत्र सुरू असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षांचे खासदार सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दिल्लीत भेट घेणार आहेत. या भेटींवरून राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. त्यातच आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकत्रित मुंबई ते कोल्हापूर असा प्रवास केला. त्यांच्यासमवेत विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकरही उपस्थित होते. त्यामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा चर्चा रंगली आहे. गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादीच्या मिलनाचे तसेच केंद्रामध्ये सुप्रिया सुळे यांच्या मंत्रिपदाची चर्चा रंगली आहे. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडून या चर्चा फेटाळून लावण्यात आल्या. परंतु राज्यात आणि दिल्लीत घडणाऱ्या घडामोडी अनेक शक्यतांना वाट करून देत आहेत. जंतरमंतरवरील आंदोलनादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी अभिजित दिपके यांची भेट घेतली होती. मात्र, अभिजित दिपके यांच्या भेटीनंतर लगेचच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात या भेटीची चांगली चर्चा रंगली होती.

# दर्गा दायरा हत्याकांडातील तिघे हैदराबादमधून ताब्यात

## महापालिका कर्मचाऱ्याच्या खूनप्रकरणी २४ तासांत एलसीबीची कारवाई । आरोपींना पळून जाण्यास मदत करणारे दोघेही ताब्यात

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

मुकुंदनगर येथील दर्गा दायरा परिसरात पथदिव्याच्या दुरुस्तीचे काम करण्यासाठी गेलेल्या महापालिका कर्मचारी धीरज कचरूसिंग रजपूत (परदेशी) यांच्या खूनप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) तत्पर कारवाई करत पसार झालेल्या तीन मुख्य आरोपींना अवघ्या २४ तासांत हैदराबाद येथून ताब्यात घेतले. आरोपींना हैदराबादला पळून जाण्यास मदत करणाऱ्या दोघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यापूर्वी एका आरोपीला अटक करण्यात आली होती. त्यामुळे या प्रकरणात पोलिसांच्या कारवाईतील आरोपींची संख्या सहा झाली आहे.

फिर्यादी अक्षय मुळे हे धीरज परदेशी यांच्यासह सहकाऱ्यांना घेऊन दर्गा दायरा परिसरात पथदिव्याच्या दुरुस्तीचे काम करण्यासाठी गेले होते. त्यावेळी मेहराज अस्लम सय्यद, सिराज अस्लम सय्यद, मुस्तकीम अस्लम सय्यद, युनूस शेख आणि अन्य दोन ते तीन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात धीरज परदेशी गंभीर जखमी झाले. उपचार सुरू असतानाच रविवारी त्यांचा मृत्यू झाला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना पसार आरोपींचा तातडीने शोध घेण्याचे आदेश दिले. त्यानंतर विशेष तपास पथक तयार करून आरोपींचा शोध सुरू करण्यात आला. बातमीदारांचे जाळे सक्रिय करण्यासह तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे मुख्य आरोपी हैदराबादमध्ये लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

माहितीची खात्री होताच एलसीबीचे पथक हैदराबादला रवाना झाले. हैदराबाद शहर पोलिसांच्या कमिशनर टास्क फोर्स आणि खैरताबाद झोनच्या मदतीने पोलिसांनी मुस्तकीम ख्वाजामिया सय्यद (वय २०), मेहराज इब्राहिम सय्यद (वय २२) आणि सिराज इब्राहिम सय्यद (वय २१, तिघेही रा. आलमगीर मदरशाजवळ, भिंगार) यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी हल्ल्यात सहभागाची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. हल्ल्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथून रेल्वेने हैदराबादला गेल्याची माहितीही त्यांनी दिली.

दरम्यान, आरोपींना शहराबाहेर पळून जाण्यास मदत कोणी केली, याचा तपास सुरू असताना ख्वाजामियाँ उर्फ अकरम याकुब सय्यद (वय ५२, रा. आलमगीर) आणि वसीम रहिम सय्यद (वय ४७, रा. वाबळे कॉलनी, फकीरवाडा, मुकुंदनगर) यांनी आरोपींना हैदराबादला पळून जाण्यास मदत केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी या दोघांनाही ताब्यात घेतले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि नगर शहर उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक हरिष भोये, पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, अंमलदार संदीप पवार, विजय ठोंबरे, फुरकान शेख, गणेश धोत्रे, शाहीद शेख, राहुल डोके, रणजीत जाधव, प्रशांत राठोड, राहुल व्दारके, रमिझराजा आतार, अरूण मोरे, अभिजीत अरकल तसेच शिर्डी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक कल्पेश चव्हाण आणि पोलीस अंमलदार कैलास राठोड सहभागी झाले होते.



### आज शहरासह उपनगरात बंदचे आवाहन

■ पालिका कंत्राटी कर्मचारी धीरज कचरुसिंग परदेशी यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याने आज अहिल्यानगर शहरात कडकडीत बंद पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हल्लेखोरांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी या मागणीसाठी हा बंद पाळण्यात येणार आहे. या बंदमध्ये शहरातील माळीवाडा, तोफखानासह भिंगार, केडगाव उपनगरात बंद पाळण्यात येणार आहे. तर कोणताही अनुसुचित प्रकार होऊ नये म्हणुन पोलिस प्रशासनाने मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# पाथर्डीत मटका अड्ड्यांवर एलसीबीची छापा

## शहरात चार ठिकाणी छापे । ५ लाख १८ हजारांचा मुद्देमाल जप्त

● **पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यात सुरू असलेल्या अवैध मटका धंद्याविरोधात अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) शनिवारी (दि. ८) धडक कारवाई केली. पाथर्डी शहरातील विविध ठिकाणी छापे टाकून मटका घेणाऱ्या पाच जणांना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल, दोन दुचाकी आणि एक चारचाकी वाहन असा एकूण ५ लाख १८ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस हवालदार गणेश लोंढे, कॉन्स्टेबल रणजित जाधव, प्रकाश मांडगे व सतीश भवर हे पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या आदेशाने पाथर्डी पोलिस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. गुप्त माहिती मिळाल्यानंतर पाथर्डी पोलिसांच्या सहकार्याने विविध ठिकाणी ही कारवाई करण्यात आली.

माणिकदौंडी चौकात पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून कल्याण मटका खेळविला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर सायंकाळी ४.१० वाजता छापा टाकण्यात आला. अतुफ खलील शेख (वय ३२) व अवेज जावेद शेख (वय २७, दोघे रा. माळी बाभूळगाव, ता. पाथर्डी) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून रोख रक्कम, दोन मोबाईल व स्विफ्ट कार असा ४ लाख २१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

चिंचपूर रोडवरील मराठी शाळेसमोर दुचाकीवरून मटका घेत असल्याची माहिती मिळाल्यानंतर सायंकाळी ४.३५ वाजता छापा टाकण्यात आला. अतिक अब्दुलवहाब शेख (वय ३७, रा. चिंचपूर रोड, कुंभारभट्टी, पाथर्डी) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून रोख रक्कम, दोन मोबाईल व टीव्हीएस व्हेगो दुचाकी असा ६० हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अतिक शेख हा इजाज शेख व लखन उर्फ इस्माईल शेख यांच्या सांगण्यावरून आर्थिक फायद्यासाठी मटका घेत असल्याचे त्याने सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

आखार भागातील सन टेलरजवळ पत्र्याच्या शेडसमोर मटका घेत असल्याची माहिती मिळाल्यानंतर सायंकाळी ५.०५ वाजता छापा टाकण्यात आला. मनोज बाळू भागवत (वय २६, रा. आखार भाग, पाथर्डी) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून रोख रक्कम व आयफोन-१३ असा ३३ हजार ५९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

यानंतर त्याच परिसरात दुचाकीवरून मटका घेत असल्याची माहिती मिळाल्याने सायंकाळी ५.३५ वाजता कारवाई करण्यात आली. अविनाश बाबासाहेब पाचारणे (वय ३१, रा. कसबा पेठ, पाथर्डी) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून रोख रक्कम, मोबाईल व दुचाकी असा ७३ हजार २० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. हा मटका व्यवसाय इजाज शेख व लखन उर्फ इस्माईल शेख यांच्या सांगण्यावरून चालवत असल्याचे त्यांनी चौकशीत सांगितल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

कोरडगाव रोडवर पेट्रोल पंपासमोर सायंकाळी ५.५५ वाजता केलेल्या कारवाईत विजय राम खोले (वय ५९, रा. इंदिरानगर, पाथर्डी) याच्याकडून रोख रक्कम व मटका खेळण्याचे साहित्य जप्त करण्यात आले. विजय खोले हा कोणासाठी मटका घेत होता, याचा तपास पोलिस करीत आहेत.

# तामिळनाडूत मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला विरोध

● **चेन्नई । वीरभूमी–**

केंद्र सरकारकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला विरोध करण्याचा निर्णय तमिळनाडूतील राजकीय पक्षांच्या बैठकीत घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तमिळनाडूच्या प्रतिनिधित्वावर मतदारसंघ पुनर्रचनेमुळे परिणाम होण्याची शक्यता असल्याने त्याला विरोध करण्याचा निर्णय घेण्यात आला. या मुद्यावर तमिळनाडू तसेच अन्य दक्षिणेकडील राज्यांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी राज्य विधानसभेत ठराव मंजूर करण्याचेही ठरले.

या बैठकीला मुख्यमंत्री विजय यांच्यासह काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पी. चिदंबरम आणि विदुथलाई चिरुथैगल काचीचे प्रमुख थोल थिरुमावलवन उपस्थित होते. मात्र, राज्यातील मोठ्या संख्येने खासदार बैठकीला अनुपस्थित राहिले. तमिळनाडूतील राज्यसभा आणि लोकसभेच्या एकूण ५७ खासदारांपैकी तब्बल ३७ खासदार बैठकीला उपस्थित नव्हते. उपस्थित २० खासदारांमध्ये काँग्रेसचे १२ खासदार होते. याशिवाय व्हीसीके, सीपीआय आणि सीपीआय(एम)चे प्रत्येकी २ खासदार, तर एमडीएमके आणि आययूएमएलचा प्रत्येकी १ खासदार बैठकीला उपस्थित होता.

बैठकीनंतर मुख्यमंत्री विजय यांच्या सरकारकडून जारी करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, लोकसभा आणि राज्यसभेतील जागांचे २.२:१ हे प्रमाण कायम ठेवण्याची मागणी खासदारांनी केली आहे. मतदारसंघ पुनर्रचनेच्या मुद्यावर तमिळनाडू आणि इतर दक्षिण भारतीय राज्यांचे अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी राज्य विधानसभेत ठराव मंजूर करण्याचा निर्णय सर्वसंमतीने घेण्यात आला. मुख्यमंत्री विजय यांनी सर्व खासदार आणि राजकीय पक्षांनी तमिळनाडूच्या अधिकारांच्या रक्षणासाठी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले. केंद्र सरकारने प्रस्तावित मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रिया मागे घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली. या प्रक्रियेमुळे तमिळनाडूचे राजकीय प्रतिनिधित्व आणि राष्ट्रीय राजकारणातील महत्त्व कमी होण्याची शक्यता असल्याचे विजय यांनी म्हटले.

तमिळनाडूतील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या द्रविड मुनेत्र कळघम आणि अण्णाद्रमुक यांनी या बैठकीवर बहिष्कार टाकला. डीएमकेने बैठकीच्या कार्यवाहीला तमाशा संबोधले, तर एआयएडीएमकेने ही बैठक घाईघाईने आयोजित केलेले नाटक असल्याची टीका केली.

बैठकीनंतर कायदामंत्री आर. निर्मल कुमार यांनी मतदारसंघ पुनर्रचनेच्या प्रक्रियेला विरोध करण्याचा निर्णय झाल्याचे सांगितले. निवडून आलेल्या सभागृहांमधील खासदारांची संख्या किंवा रचनेत बदल करण्याची आवश्यकता नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. लोकसभेतील ५४३ सदस्यांच्या संख्येत कोणताही बदल करण्याची गरज नाही. त्याचप्रमाणे तमिळनाडूच्या ३९ लोकसभा जागांमध्येही कोणताही बदल करण्याची आवश्यकता नाही असे निर्मल कुमार यांनी सांगितले. केंद्रातील भाजप सरकार निवडणुकीतील राजकीय गणित आणि सहज विजय मिळवण्याच्या उद्देशाने मतदारसंघ पुनर्रचनेची प्रक्रिया पुढे नेत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

# अहिल्यानगरमार्गे पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे नेण्यास विरोध

## चाकण-सिन्नर मार्गावर चक्का जाम । समृद्धी मार्गही रोखला

● **संगमनेर । वीरभूमी–**

पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचे काम सुरू असतानाच अचानक एक मोठा बदल यात करण्यात आला. त्यामुळे पुणे आणि नाशिक जिल्ह्यातील लोक संतप्त झाले असून रविवारी आमदार सत्यजीत तांबे, बाळासाहेब थोरात, खासदार वाजे यांच्यासह सर्वपक्षीय चक्का जाम आंदोलन झाले आहे. याचा फटका वाहतुकीला बसला आहे.

चक्का जाम आंदोलन चाकण ते सिन्नर मार्गावर करण्यात आले. पुणे-नाशिक जिल्ह्यातील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात आंदोलनात उतरल्याने अनेक ठिकाणी वाहतुकीला फटका बसला. पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे अहिल्यानगरमार्गे वळवल्याचा लोकांमध्ये राग आहे. त्यामुळे संगमनेरमध्ये बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली, सिन्नरमध्ये खासदार वाजे आणि सत्यजीत तांबे यांच्या नेतृत्वाखाली चक्का जाम आंदोलन करण्यात आले.

हायस्पीड रेल्वे मार्ग बदलून संगमनेरऐवजी अहिल्यानगर मार्गे वळवल्यामुळे चाकण ते सिन्नर चक्का जाम आंदोलन करण्यात आले. वास्तविक याबाबत सरकारने एक समिती स्थापन केली असून ही समिती ६० दिवसांत अहवाल सादर करणार आहे. मात्र, सरकार हा मार्ग का बदलत आहे आणि सर्वेक्षण झाल्यानंतर अचानक असं काय झालं की सरकारला मार्ग बदलावा लागत आहे, असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहेत. यावरून या भागात तीव्र नाराजी आहे. हा प्रश्न नुसता रेल्वेचा नाही तर संपूर्ण भागाच्या भवितव्याचा आहे, याकडे आंदोलक लक्ष वेधत आहेत.



पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प होत आहे. हा मार्ग मंजूर झाला असून याला बँकेनेही कर्ज मंजूर केले आहे, महाराष्ट्र सरकारनेही त्यांचा वाटा मान्य केला आहे. हा सरळ मार्ग असताना हा मार्ग बदलण्यात आला आहे. याला बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजीत तांबे, खासदार राजाभाऊ वाजे आदी लोकप्रतिनिधींनी आक्षेप घेतला आहे. हा सेमी हायस्पीड मार्ग पुणे ते नाशिक व्हाया संगमनेर असा असताना तो नारायणगाव येथील जीएमआरटीचे कारण देत अहिल्यानगर मार्गे वळवण्याचा घाट घातला आहे. याला दोन्ही जिल्ह्यांतील ग्रामस्थांनी जोरदार विरोध केला आहे. या विरोधातच चक्का जाम आंदोलन करण्यात आले.

पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प सुमारे २३५ किलोमीटरचा आहे. या ट्रेनचा वेग ताशी २०० किमी ठेवण्याचे नियोजन आहे. यात राज्य सरकारचा आर्थिक सहभाग आहे. हा मार्ग संगमनेरमधून जाणार आहे. याला केंद्रानेही मंजुरी दिली आहे. पण, अचानक नारायणगावमधील जीएमआरटी रेडिओ दूर्बिणींवर याचा परिणाम होईल, असे सांगून हा मार्ग बदलण्यात येत आहे. आता संगमनेरऐवजी अहिल्यानगर मार्गे रेल्वेचा मार्ग होत आहे. याला पुणे आणि नाशिक जिल्ह्यातील ग्रामस्थांनी विरोध केला आहे. सरळ मार्ग असताना तो आडमार्गाने का नेण्यात येत आहे, असा सवाल चक्का जाम आंदोलनात उतरलेले काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केला आहे.

### चाकण मध्ये आंदोलक-पोलिस यांच्यात झटापट

■ पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचा मूळ मार्ग पूर्ववत करावा या मागणीसाठी रविवारी (दि. ९ ऑगस्ट) क्रांती दिनाचे औचित्य साधून उत्तर पुणे जिल्ह्यात ठिकठिकाणी तीव्र चक्काजाम आंदोलन करण्यात आले. चाकण येथील तळेगाव चौकात खेडचे आमदार बाबाजी काळे यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय आंदोलन छेडण्यात आले. यावेळी महामार्ग रोखण्याचा प्रयत्न करणारे आंदोलक आणि पोलिसांमध्ये जोरदार झटापट झाली. पोलिसांनी आक्रमक आंदोलकांना रोखण्यासाठी बळाचा वापर करत अनेक कार्यकर्त्यांची उचलबांगडी केली आणि त्यांना ताब्यात घेतले.

# तटकरेंच्या प्रदेशाध्यक्ष पदाविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार

● **मुंबई । वीरभूमी–**

अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षात सर्वकाही आलबेल नसल्याचे चित्र अनेकदा पाहायला मिळाले. त्यातच प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांच्यावर अनेक नेते नाराज असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे तटकरेंच्या प्रदेशाध्यक्षपदाला पक्षातूनच विरोध होत आहे. दरम्यान, आता तटकरे यांचे पदच घटनाबा असल्याची तक्रार थेट निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे. त्यामुळे तटकरेंना प्रदेशाध्यक्षपद सोडावे लागण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या नियुक्तीविरोधात निवडणूक आयोगात तक्रार करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यातील मंठा-परतूर विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब गोरे यांनी ही तक्रार केली. पक्षाच्या संविधानाला डावलून, अंतर्गत लोकशाहीचे नियम धाब्यावर बसवून तटकरेंची नियुक्ती केली आहे, असा आक्षेप नोंदवितानाच तटकरेंचा कार्यकाळ घटनाबा असल्याचा आक्षेप घेत भाऊसाहेब गोरे यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली.

या तक्रारीत तटकरे यांच्या नियुक्तीचा ३ वर्षांचा सामान्य कार्यकाळ जुलै २०२६ मध्ये संपुष्टात आला असून कोणतीही संघटनात्मक निवडणूक न घेता तटकरे अद्याप पदावर कसे कार्यरत आहेत, असा सवाल उपस्थित केला. तसेच तकटरेंच्या जालना दौ-यात अजित पवार यांच्या नावाच्या घोषणा दिल्याने तटकरेंनी जिल्ह्यातील अनेक पदाधिका-यांना पदावरून हटवल्याचाही आरोप गोरे यांनी केला. यामुळे जालन्यासह राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.

### तटकरे यांना पद सोडण्याची मागणी

राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी म्हटले की, 'अजितदादा असताना पक्षात काही निर्णय झाले होते. त्यातच प्रशांत किशोर यांनी प्रांताध्यक्ष बदलल्याशिवाय मी काम करणार नाही, असे म्हटले. रणनितीकार निवडणे हा पक्षाचा अधिकार आहे. प्रदेशाध्यक्ष बदलणार हे अजितदादांनी आम्हाला सांगितले होते. जर पक्ष संघटन मजबूत करायचे असेल तर बदल व्हायला हवा, असेही त्यांनी म्हटले.

## SPOT NEWS



### महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवून मनस्वी मनोज साखरेचे नेत्रदीपक यश

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

शिवाजीराव नागवडे डेफोडील्स स्कूल, श्रीगोंदा येथील इयत्ता दुसरीच्या वर्गात शिकणारी विद्यार्थिनी कु. मनस्वी मनोज साखरे हिने एक्सेलंट ऑलिम्पियाड परीक्षा २०२५-२६ मध्ये २०० पैकी तब्बल १९८ गुण मिळवत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक प्राप्त करून आपल्या कर्तृत्वाची शानदार छाप उमटवली आहे. इयत्ता दुसरीत शिकत असतानाच महाराष्ट्राच्या स्तरावर प्रथम क्रमांक मिळवण्याची मनस्वीची ही कामगिरी निश्चितच अभिमानाची आणि कौतुकाची बाब आहे. अवघ्या दुसरीच्या वर्गातील विद्यार्थिनीने मिळवलेले हे उल्लेखनीय यश तिच्या बुद्धिमत्तेची, मेहनतीची, जिद्दीची आणि सातत्यपूर्ण अभ्यासाची पावती आहे. विशेष अभिमानाची बाब म्हणजे, मनस्वी साखरे हिने यापूर्वीदेखील मंथन तसेच एक्सेलंट ऑलिम्पियाड परीक्षेमध्ये महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक प्राप्त केला होता. यापूर्वी राज्यात दुसरा क्रमांक मिळवून आपल्या गुणवत्तेची प्रचिती देणाऱ्या मनस्वीने यावेळी एक पाऊल पुढे टाकत २०० पैकी १९८ गुण मिळवून महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. मनस्वीचे हे यश तिच्या सातत्यपूर्ण अभ्यासाचे, कठोर परिश्रमाचे, आत्मविश्वासाचे आणि जिद्दीचे फलित आहे. तिच्या या यशामागे तिच्या आई-वडिलांचे प्रोत्साहन, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि तिची स्वतःची मेहनत यांचा मोलाचा वाटा आहे. तिच्या या नेत्रदीपक कामगिरीमुळे शिवाजीराव नागवडे डिफेन्सी स्कूल, श्रीगोंदा तसेच तिच्या कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. मनस्वीचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठीही निश्चितच प्रेरणादायी आहे. इयत्ता दुसरीत शिकत असताना महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवणे आणि यापूर्वीही राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त करणे, ही तिच्या सातत्यपूर्ण गुणवत्तेची आणि मेहनतीची विशेष दखल घेण्यासारखी कामगिरी आहे. शाळेतील इतर विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शंभूराजे प्रवीण जामदार २०० पैकी १९८ (मराठी मेडीयम) गुण राज्यात प्रथम इयत्ता पहिली ची ओवी अमोल नागवडे हिने १९२ गुणांसह राज्यात प्रथम क्रमांक, ज्ञानेश्वरी राहुल जामदार हिने १९२ गुणांसह चौथा क्रमांक, कुशनप्रकाश जनार्धन कान्हेरकर याने १९० गुणांसह पाचवा क्रमांक, स्वरूप गोरख कोथिंबिरे याने १९४ गुणांसह तिसरा क्रमांक, प्रसन्ना सूर्यभान गोलांडे हिने १८८ गुणांसह तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे.

### हस्तलिखित ज्ञानेश्वरीकार रमेश भारती व चित्रकार-छायाचित्रकार लक्ष्मण झिंजुर्के यांचा रविवारी गौरव

**● शेवगाव । वीरभूमी–**

सुजन ग्रामगौरव समिती, शेवगावच्या वतीने उल्लेखनीय कार्याबद्दल हस्तलिखित ज्ञानेश्वरीकार रमेश भारती गुरु शंकर भारती आणि चित्रकार-छायाचित्रकार लक्ष्मण झिंजुर्के यांना ग्रामगौरव सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. हा सन्मान सोहळा रविवार (ता. १६) रोजी सकाळी ९.३० वाजता शेवगाव-आखेगाव रस्त्यावरील स्वराज मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाड्याचे माजी विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर राहणार आहेत. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे छायाचित्रकार बैजू पाटील आणि जोग महाराज संस्थानचे प्रमुख राम महाराज झिंजुर्के यांच्या हस्ते सन्मान सोहळा होणार आहे. यावेळी अमरावतीचे उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, लेखक व व्याख्याते दीपक सु. कुलकर्णी (सातारा), शेवगावच्या नगराध्यक्षा माया मुंडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे निमंत्रक प्रा. दिलीप फुलके (अध्यक्ष), प्रा. किसन माने (उपाध्यक्ष), प्रा. कचरदास सारडा (सचिव) तसेच समितीचे सदस्य रामेश्वर जाजू, मिलिंद काटे, कन्हैय्या सारडा आणि उमेश घेवरकर यांनी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

### जिल्हास्तरीय ज्युनिअर थलेटिक्स स्पर्धा १५ व १६ ऑगस्ट रोजी लोणीत रंगणार

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्हा थलेटिक्स असोसिएशनच्या वतीने 'अहिल्यानगर जिल्हास्तरीय कनिष्ठ गट मैदानी स्पर्धा (ज्युनिअर थलेटिक्स) अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२०२७' चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा आगामी १५ आणि १६ ऑगस्ट २०२६ रोजी लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पार पडणार असल्याची माहिती असोसिएशनच्या वतीने देण्यात आली आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व क्वालिफायिंग स्टँडर्ड्स पूर्ण करणाऱ्या खेळाडूंची डेरवण (जि. रत्नागिरी) येथे दिनांक २७ ते ३० ऑगस्ट रोजी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे. या स्पर्धेत खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष सुनील जाधव, उपाध्यक्ष राजेंद्र कोतकर व सचिव दिनेश भालेराव यांनी केले आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंना स्पर्धेच्या दोन्ही दिवशी ऑफलाईन पद्धतीने प्रवेशिका जमा करता येतील. ही स्पर्धा केवळ अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंसाठीच आयोजित करण्यात आली आहे.

# घोटण येथील मल्लिकार्जुन मंदिरातील चांगनाथाचा शिलालेख

**केवळ धार्मिक उल्लेख करणारा लेख नसून तत्कालीन देवस्थानाच्या व्यवस्थेवर प्रकाश टाकणारा महत्त्वपूर्ण पुरावा**

**■ विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शेवगाव तालुक्यातील घोटण येथील प्रसिद्ध मल्लिकार्जुन महादेव मंदिराच्या सभामंडपात एका मोकळ्या, सुट्या गधेगळ प्रकारच्या शिळेवर हा महत्त्वपूर्ण शिलालेख कोरलेला आहे. सदर शिलालेख कोरीव स्वरूपाचा असून चार ओळींचा आहे. लेखासाठी देवनागरी लिपीचा वापर करण्यात आला असून भाषा मराठी आहे.

शिलालेखाची शिळा गुळगुळीत असून वातावरणाच्या परिणामामुळे लेखातील काही अक्षरे पुसट झाली आहेत, तर काही अक्षरे तुटलेली आहेत. मात्र लेखाचा छाप घेतल्यानंतर अथक परिश्रमपूर्वक त्यावरील मजकूर वाचता येतो.

**शिलालेखाचे वाचन**

**१. ॐ पपालकीयेचे चांगनाथाचां पाचि द्राम**
**२. केले षामा ललोपि तोडी नाथ जो नेदिआ बां**
**३. दी तेआचिये माऐ बापु गाढौ ननां गरी**
**४. जे**

शिलालेखातील मजकुरावरून श्री चांगनाथाच्या पालखीच्या सेवेसाठी पाच दाम देण्याची व्यवस्था करण्यात आलेली असल्याचे दिसून येते. चांगनाथाच्या पालखीच्या धार्मिक सेवेसाठी संबंधित व्यक्ती किंवा कुटुंबाने ठरावीक पाच दामांची रक्कम देणे अपेक्षित होते. त्याचबरोबर पालखी वाहून नेण्यासाठी आवश्यक असलेला मनुष्य किंवा सेवक उपलब्ध करून देण्याची जबाबदारीही संबंधित व्यक्तीवर सोपविण्यात आली होती.

या आदेशाचे पालन न करणाऱ्यास किंवा शासनाचा लेख लोपविणाऱ्या, पुसणाऱ्या अथवा तोडणाऱ्या व्यक्तीस दोषी मानण्यात आले असावे. शिलालेखाच्या शेवटी या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्याविषयी कठोर शापवचन देण्यात आले आहे. संबंधित व्यक्तीच्या आई-वडिलांना गाढवाशी जोडणारा आणि त्यांच्या घरावर नांगर फिरविण्याचा शाप देण्यात आलेला दिसतो.





अशा प्रकारची शापवचने मध्ययुगीन शिलालेखीय परंपरेत आढळतात. धार्मिक किंवा सामाजिक आदेशाचे उल्लंघन होऊ नये आणि तो दीर्घकाळ अबाधित राहावा, यासाठी अशा कठोर शब्दांचा वापर केला जात असे.

घोटण येथील हा शिलालेख केवळ धार्मिक उल्लेख करणारा लेख नसून तत्कालीन देवस्थानाच्या व्यवस्थेवर प्रकाश टाकणारा महत्त्वपूर्ण पुरावा आहे. चांगनाथाच्या पालखीसेवेसाठी आर्थिक योगदानाबरोबरच मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची व्यवस्था या लेखातून स्पष्ट होते.

शिलालेखातील पाच दामांची नोंद पाहता देवस्थानाच्या धार्मिक उपक्रमांसाठी ठरावीक आर्थिक योगदान निश्चित केलेले होते, असे दिसते. त्याचबरोबर पालखी वाहून नेण्यासाठी आवश्यक मनुष्य किंवा सेवक उपलब्ध करून देण्याची जबाबदारीही संबंधित व्यक्तींवर सोपविण्यात आली होती. त्यामुळे देवस्थानाच्या व्यवस्थेत केवळ आर्थिक योगदान नव्हे, तर प्रत्यक्ष श्रमसेवाही महत्त्वाची होती.

यावरून पालखीसेवा ही केवळ वैयक्तिक धार्मिक श्रद्धेची बाब नसून सामुदायिक आणि नियमबद्ध स्वरूपाची सेवा होती, असे दिसून येते. कोणाकडून किती आर्थिक योगदान घ्यायचे आणि धार्मिक उत्सवासाठी आवश्यक मनुष्यबळ कसे उपलब्ध करून घ्यायचे, यासंबंधी स्थानिक पातळीवर निश्चित व्यवस्था अस्तित्वात होती.

या शिलालेखातील 'शासन' किंवा आदेश कोणीही लोपवू नये, पुसू नये अथवा तोडू नये, अशी ताकीद असल्याचे दिसते. त्यामुळे हा लेख केवळ धार्मिक माहितीची नोंद नसून स्थानिक समाजाने मान्य केलेला नियम किंवा आदेश असण्याची शक्यता दिसून येते. तो दगडावर कोरून सार्वजनिक स्वरूपात नोंदविण्यामागे हा आदेश पुढील पिढ्यांपर्यंत कायम राहावा, हा उद्देश असावा.

शासनाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला कठोर शाप देण्याची परंपरा तत्कालीन सामाजिक आणि धार्मिक मानसिकतेचे दर्शन घडवते. आई-वडिलांना गाढवाशी जोडणारा आणि घरावर नांगर फिरविण्याचा शाप हा अपमानसूचक तसेच सामाजिक दबाव निर्माण करणारा शाप मानता येतो.

अशा प्रकारे घोटण येथील मल्लिकार्जुन मंदिरातील हा शिलालेख चांगनाथाच्या पालखीसेवेची परंपरा, देवस्थानाची आर्थिक व्यवस्था, सामुदायिक श्रमसेवा, स्थानिक सामाजिक जबाबदाऱ्या आणि धार्मिक शासनव्यवस्था यांचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वाचा ठरतो. स्थानिक धार्मिक संस्था आणि तत्कालीन समाजजीवन यांचा परस्परसंबंध किती घनिष्ठ होता, तसेच धार्मिक उत्सवांसाठी आर्थिक आणि श्रमस्वरूपातील योगदान कशा पद्धतीने निश्चित केले जात होते, याची मौल्यवान माहिती या लेखातून मिळते.

या शिलालेखाचे संशोधन, माहिती व वाचन पुणे येथील अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे तर त्यांना डॉ. शैलेंद्र भांडारे, अथर्व पिंगळे, अमोल बनकर व दिलीप शिंदे (गुरव) यांचे विशेष सहकार्य व मदत मिळाली आहे.

## अगस्ती इन्स्टिट्यूटचे एमबीए, एमसीए विभागात विद्यार्थ्यांचे उल्लेखनीय यश; गुणवंतांचा संस्थेतर्फे गौरव

**● अकोले । वीरभूमी –**

अगस्ती इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन ॲण्ड रिसर्च, अकोले या परिसंस्थेने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नुकत्याच जाहीर झालेल्या परीक्षांमध्ये घवघवीत यश संपादन केले. एमबीए आणि एमसीए विभागातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

एमबीए विभागात देशमुख रमेश संपतराव याने ७२ टक्के गुण मिळवत विभागात प्रथम क्रमांक पटकावला. खांबेकर प्रसन्ना संतोष हिने ७१.९० टक्के गुणांसह द्वितीय, तर देशमुख योगेश अप्पासाहेब याने ७१.१८ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

एमबीए प्रथम वर्षात देशमुख ऋतुजा राजेंद्र हिने ७१.३७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. पवार संदिप ताराचंद याने ६८.८८ टक्के गुणांसह द्वितीय, तर गोरे सायली बाळासाहेब हिने ६८.६८ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

थेट द्वितीय वर्ष एमबीए (लॅटरल एन्ट्री) परीक्षेत आभाळे ऋतुजा भाऊसाहेब हिने ७०.८१ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. कर्पे अभिषेक ज्ञानेश्वर याने ७०.७५ टक्के गुणांसह द्वितीय, तर पन्हाळकर अर्चना रामकिसनराव हिने ६७ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला.

एमसीए विभागात गोर्डे अनुजा भिकाजी हिने ७७.९१ टक्के गुणांसह विभागात प्रथम क्रमांक मिळविला. वैद्य अनुजा भाऊसाहेब हिने ७१.०८ टक्के गुणांसह द्वितीय, तर आहेर प्रिया म्हाळू हिने ७०.६९ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला.

एमसीए प्रथम वर्षात आहेर माधुरी एकनाथ हिने ७६.८३ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. देशमुख पुनम अरुण हिने ७५.८३ टक्के गुणांसह द्वितीय, तर देशमुख प्राची भाऊसाहेब हिने ७५.६६ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. ही माहिती परीक्षा विभागप्रमुख प्रा. सुयोग गजे यांनी दिली.

या यशाबद्दल अ.ता.ए. सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त वैभवराव पिचड, कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, स्वीकृत विश्वस्त सुरेशराव कोते, मधुकर सोनवणे, डॉ. संपतराव वैद्य, अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, खजिनदार धनंजय संत, सर्व विश्वस्त व कार्यकारिणी सदस्य, परिसंस्थेचे संचालक डॉ. प्रशांत तांबे, एमबीए विभागप्रमुख डॉ. गोपाल बूब, एमसीए विभागप्रमुख प्रा. अमोल नवले, तसेच सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

परिसंस्थेचे प्राध्यापक गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी नेहमीच कटिबद्ध असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी परिसंस्था कायम पुढे असून, विद्यार्थ्यांचे हे यश त्या प्रयत्नांचे फलित आहे, असे गौरवोद्गार परिसंस्थेचे संचालक डॉ. प्रशांत तांबे यांनी व्यक्त केले.

## पाटबंधारे कर्मचारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी दत्तात्रय आवारी; व्हाईस चेअरमनपदी संतोष जायभाय

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खाते कर्मचारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी दत्तात्रय सुदाम आवारी, तर व्हाईस चेअरमनपदी संतोष सुभाष जायभाय यांची बिनविरोध निवड झाली. शनिवारी (दि. ८ ऑगस्ट) झालेल्या निवड प्रक्रियेत दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने निवडणूक बिनविरोध पार पडली.

जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक किरण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाच्या बैठकीत ही प्रक्रिया झाली. चेअरमनपदासाठी दत्तात्रय आवारी यांच्या अर्जाला किशोर गांगर्डे सूचक व सुरेश ढोमसे अनुमोदक होते. व्हाईस चेअरमनपदासाठी संतोष जायभाय यांच्या अर्जाला दिपक वाघ सूचक व संदीप शेरकर अनुमोदक होते.

निवड जाहीर झाल्यानंतर विकास पॅनलच्या वतीने नवनिर्वाचित चेअरमन आवारी व व्हाईस चेअरमन जायभाय यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संचालक मंडळाने विकास पॅनलचा जयघोष करत जल्लोष केला.

विकास पॅनलचे अध्यक्ष किशोर गांगर्डे यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करताना सभासद हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याची भूमिका स्पष्ट केली. संस्थेचा कारभार पारदर्शक असून, सभासदांना जिल्ह्यातील सर्वात कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या संस्थेचा लौकिक कायम ठेवत व्याजदर आणखी कमी करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

संस्थेच्या ठेवींमध्येही मोठी वाढ झाली असून, श्रीगोंदा शाखेने एकाच दिवसात एक कोटी रुपयांच्या ठेवी जमा केल्या, तर शेवगाव शाखेने यापूर्वी ५० लाख रुपयांच्या ठेवी जमा केल्याचे गांगर्डे यांनी सांगितले. संचालक मंडळाने सभासदांचा विश्वास संपादन केला असून तो कायम राखण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. नवनिर्वाचित चेअरमन दत्तात्रय आवारी यांनी संचालक मंडळाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल आभार मानले. सभासद हिताचे निर्णय घेत संस्थेच्या विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

व्हाईस चेअरमन संतोष जायभाय यांनीही आपल्यावर सोपवलेल्या जबाबदारीबद्दल आभार व्यक्त केले. कुकडीला न्याय देण्यासाठी ही जबाबदारी देण्यात आली असून संस्थेचे कामकाज अधिक प्रभावीपणे सुरू ठेवण्याची ग्वाही त्यांनी दिली. यावेळी संचालक मंडळातील सदस्यांसह माजी पदाधिकारी, तज्ज्ञ संचालक व प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद परदेशी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळासोबत मनाचीही मजबुती आवश्यक

**भाऊसाहेब गोरे । तायक्कांदो अकॅडमीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकास व आनंददायी शिक्षण कार्यशाळा**

**● पाथर्डी । वीरभूमी –**

सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत आणि वाढत्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शरीरासोबत मनाचीही मजबुती आवश्यक आहे. त्यासाठी खेळ आणि नियमित व्यायामाला जीवनात महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे, असे प्रतिपादन बेस्ट फाउंडेशनचे अध्यक्ष भाऊसाहेब गोरे यांनी केले.

पाथर्डी तालुका तायक्कांदो अकादमीअंतर्गत चॅम्पियन्स तायक्कांदो अकॅडमीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकास व आनंददायी शिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना गोरे बोलत होते.

गोरे म्हणाले, तायक्कांदो, कराटे यांसारखे खेळ विद्यार्थ्यांना केवळ शारीरिकदृष्ट्या सक्षम बनवत नाहीत, तर स्वसंरक्षण, शिस्त, आत्मविश्वास आणि धैर्यही शिकवतात. स्वतःवर विश्वास ठेवणे, भीती व रागावर नियंत्रण मिळविणे आणि स्वतःच्या कमकुवतपणावर मात करण्याची ताकद अशा खेळांमधून निर्माण होते. त्यामुळे समाजाने अशा उपक्रमांना पाठबळ दिले पाहिजे.

तुम्हाला केवळ जिंकायचे नाही, तर स्वतःची सर्वोत्तम आवृत्ती बनायचे आहे. कराटे किंवा तायक्कांदोच्या मैदानावर आलेली शिस्त अभ्यासाच्या टेबलावर आली, तर विद्यार्थ्यांचे भविष्य निश्चितच उज्ज्वल होईल, असेही त्यांनी सांगितले.

कार्यशाळेत पारंपरिक पद्धतीऐवजी हसत-खेळत आणि कृतीतून शिक्षणाचा अनुभव देण्यात आला. गाणी, गोष्टी, विविध मजेशीर खेळ आणि संवादाच्या माध्यमातून भाषा, गणित, विज्ञान, देशभक्ती व कला या विषयांतील संकल्पना विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आल्या. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत कार्यशाळेचा आनंद लुटला.

यावेळी समाजासाठी आयुष्य वेचणारे संत-महात्मे तसेच विविध थोर व्यक्तींच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आले. त्यांच्या





■ छाया । अनिल खाटेर

जीवनातील संकटे, अडचणी आणि संघर्षांवर त्यांनी केलेली मात यांची उदाहरणे देत अडचणींना घाबरून न जाता धैर्याने सामना करण्याचा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी पाथर्डी तालुका तायक्कांदो अकादमीचे सचिव अंबादास साठे होते. व्यासपीठावर राजेंद्र जायभाय, सौ. ऋतुजा गुगळे, सौ. शिंदे आदी उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रशिक्षक पायल असलकर यांनी केले. भारतीताई असलकर यांनी सूत्रसंचालन केले, तर नंदिनी काटकर यांनी आभार मानले. कार्यशाळेला तायक्कांदो अकॅडमीचे विद्यार्थी, पालक तसेच नागरिक उपस्थित होते.

# अधिकारी निष्क्रिय झाले तर जनतेच्या भावनांचा उद्रेक : ना. राधाकृष्ण विखे पाटील

**टंचाई आढावा बैठकीत नागरिकांच्या प्रश्नांवर पालकमंत्र्यांचे अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश**




**● पारनेर । वीरभूमी –**

अधिकारी निष्क्रिय होतात, तेव्हा लोकांच्या भावनांचा उद्रेक होतो. प्रत्येक प्रश्नाला न्याय देण्याच्या भूमिकेतून काम करण्याचे निर्देश जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिले.

पारनेर तालुक्यात मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत टंचाई आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार काशिनाथ दाते, भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, सुजित झावरे, विश्वनाथ कोरडे, अशोक सावंत यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

बैठकीत तालुक्यातील पाणी, वीज, रस्ते आणि औद्योगिक वसाहतींसंदर्भात नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांची मंत्री विखे पाटील यांनी दखल घेत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. औद्योगिक वसाहतीतून तलावात सोडण्यात येणाऱ्या रसायनयुक्त पाण्याबाबत प्रांताधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून प्रदूषण नियंत्रण मंडळाला अहवाल पाठवावा, असे निर्देश त्यांनी दिले.

जामगाव येथे टँकरची मागणी असतानाही निर्णय होत नसल्याबद्दल मंत्री विखे पाटील यांनी गटविकास अधिकारी सोनकुसळे यांना चुकीची माहिती दिल्याबद्दल कडक शब्दांत ताकीद दिली. तसेच जामगावचा टँकर तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले.

शहरातील रस्त्यांची कामे दुभाजक टाकूनच पूर्ण करावीत, असे स्पष्ट निर्देश देत पावसामुळे रस्त्यांवर पडलेले मोठे खड्डे तातडीने बुजवून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी दिल्या.

तालुक्यातील सहा उपसा सिंचन योजनांना जलसंपदा विभागाने मंजुरी दिली असून, त्यापैकी तीन योजनांना मुळा धरणातून पाणी उपलब्ध होत आहे. उर्वरित तीन योजनांसाठी पाण्याची उपलब्धता करून देण्याबाबत लवकरच निर्णय होईल. त्यामुळे अनेक गावांचा पाणीप्रश्न सोडविण्यास मोठी मदत होणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

पिंपळगाव जोगा धरणातून पाणी सोडण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या असून, चार्याच्या दुरुस्तीसाठी १०१ कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

यापूर्वी तालुक्यात केवळ खंडणीचे राज्य होते. योजना फक्त कागदावर होत्या आणि केवळ बिले काढण्याचे काम झाले. मात्र, आता तालुक्याची परिस्थिती पूर्णपणे बदलत आहे. गुंडगिरी हद्दपार होऊन विकासकामे सुरू आहेत. आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून आणखी मोठ्या प्रमाणात कामे होणार असून, त्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. नागरिकांनी ठेवलेल्या सर्व अपेक्षा पूर्ण करण्याची ग्वाही देतो, असे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

आमदार काशिनाथ दाते यांनी अधिकाऱ्यांनी कामाबाबत गांभीर्य दाखवावे आणि कामांसाठी नागरिकांना कार्यालयांच्या चकरा मारायला लावू नयेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच वीजभारनियमनाचा प्रश्न मांडत ही समस्या सोडविण्याची विनंती त्यांनी पालकमंत्री विखे पाटील यांच्याकडे केली.

# श्रीगोंद्यात 'टोळधाड' टोळीच्या दहशतीमुळे तीन सरकारी डॉक्टरांचे तडकाफडकी राजीनामे?

## ... या टोळीला कुणीतरी वठणीवर आणा अशीच सर्वसामान्यांची इच्छा !!

■ विजय उंडे

● श्रीगोंदा । वीरभूमी – तालुक्यात 'टोळधाड' टोळीने आतापर्यंत अनेकांचे प्रपंच मोडले आहेत. त्यात अधिकारी वर्गाचा भरणा मोठा आहे. विशेषतः ही 'टोळधाड' गँग अधिकारी व कर्मचारी महिलावर्ग यांना टार्गेट करतात त्यांच्याकडून वेगवेगळ्या आमिषाची अपेक्षा करतात. अपेक्षा पूर्ण न झाल्यास त्यांच्या तक्रारी व सामाजिक बुरखा धारण करून आंदोलनाच्या मार्गाने ब्लॅकमेल करतात. या 'टोळधाड' टोळीमुळे श्रीगोंदा तालुक्यातील तीन सरकारी डॉक्टरांनी तडकाफडकी राजीनामे दिल्याची चर्चा जनमानसात सुरू आहे. विशेषतः लोणी प्राथमिक आरोग्य केंद्रातील महिला डॉक्टरने राजीनामा दिल्याने या बाबींना दुजोरा मिळाला आहे.

वैद्यकीय अधिकारी वर्गाला अलीकडच्या कालखंडामध्ये 'टोळधाड' गँगने लक्ष्य केले आहे. सामाजिकतेचा बुरखा पांघरून त्या डॉक्टरांमध्ये दहशत निर्माण केली जाते. तालुक्यातील अधिकारी या टोळीच्या पूर्णपणे दडपणाखाली आहेत. लोणी घटनेच्या पार्श्वभूमीवर तीन डॉक्टरांनी तडकाफडकी राजीनामे प्रशासनाकडे दिले. या तिघांमध्ये दोन महिला डॉक्टरांचा समावेश आहे. लोणी येथील त्या तथाकथित आंदोलनामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र लोणी व्यंकनाथ येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहल चंद्रकांत गायकवाड यांनी तडकाफडकी राजीनामा दिल्याने या डॉक्टर अधिकाऱ्यांची बाजू पुढे येणे गरजेचे आहे.

मूळ चिंभळा



येथील डॉ. स्नेहल चंद्रकांत गायकवाड या लोणी येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. नुकतीच त्यांनी एमबीबीएस ही पदवी संपादन केली होती. टोळधाड टोळीच्या सामाजिक असंतोष पसरवणाऱ्या घटनेचा त्यांना सामना करावा लागला. या दहशतीखाली त्यांनी राजीनामा दिल्याची चर्चा चिंभळा परिसरात आहे. कोळगाव येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतिक्षा काशिनाथ थोरवे यांनीही तातडीने आपल्या पदाचा राजीनामा वरिष्ठांकडे सोपवला आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवगण येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिषेक भरत लगड यांनीही राजीनामा दिला आहे.

एमबीबीएसचे नुकतेच शिक्षण पूर्ण करून नव्याने रूजू झालेल्या या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तातडीने राजीनामे दिले याची तालुक्यात उलटसुलट चर्चा आहे.

### 'अर्वाच्य' भाषेलाही काही मर्यादा असतात हो...!!

■ लोणी व्यंकनाथ येथील दोन बालिका मृत्यू प्रकरणाचे भांडवल करीत ते तथाकथित आंदोलन झाले. त्या आंदोलनात युवती डॉक्टरांना कोंडून घेऊन बेकायदेशीर जमाव गोळा करून अश्लाघ्य भाषेचा वापर केला. तसेच हिणकस भाषा वापरली. ही भाषा वापरणाऱ्या तथाकथित समाजसेवकांची क्लिप सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामुळे तालुक्यातील समाजमन दुखावले आहे. चिंभळा व लोणी व्यंकनाथ येथील आरोग्य केंद्रात कार्यरत असणारी मागासवर्गीय समाजाची क्वालिफाइड, तज्ञ डॉक्टर तरुणीने राजीनामा दिला. छोट्या छोट्या प्रकरणांमध्ये मागासवर्गीय संघटना पुढे येतात मात्र हा एवढा मोठा गंभीर विषय असताना प्रत्येक मागासवर्गीय संघटना त्याकडे दुर्लक्ष करताहेत हे विशेष.

### मला न्याय द्या हो...- सरकारी वैद्यकीय अधिकारी

■ सरकारी वैद्यकीय आरोग्य केंद्राकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन उदासीन आहे. तसाच तो शासनकर्त्यांचाही आहे. राज्यातील सर्वच प्राथमिक आरोग्य केंद्रात सोयीसुविधांचा अभाव आहे. शासनाकडून पाहिजे एवढा निधी, कर्मचारी, वेगवेगळ्या मशिनरीज या उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. समाजाच्या मात्र या आरोग्य केंद्राकडून मोठ्या अपेक्षा असतात. पण शासनाच्या धोरणामुळे त्या अधिकारी पूर्ण करू शकत नाहीत. वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समाज व शासन यामध्ये सँडविच होत आहे.

वैद्यकीय क्षेत्रातील मुलांचे एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते सरकारी नौकरी करण्यात उदासीनता दाखवतात. किंबहुना सरकारी नौकरी करण्याकरिता नकारघंटा दाखवतात. शासनाकडे वरपासून खालपर्यंत वैद्यकीय अधिकाऱ्यांची वानवा हाती. त्यावर उपाययोजना म्हणून शासनाने खुष्कीचा मार्ग काढला. एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एक वर्ष सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्रात सरकारी नौकरी करणे बंधनकारक ठेवले. त्यामुळे सरकारी रुग्णालयाला मोठ्या प्रमाणात आरोग्य अधिकारी मिळू लागले. त्यातच श्रीगोंदा तालुक्यातही अशा अधिकाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. या तरुण डॉक्टरांना लक्ष्य केल्यामुळे तालुक्यातील सगळ्याच सरकारी वैद्यकीय डॉक्टरांमध्ये दहशत पसरली आहे.

# पारनेर दुष्काळमुक्त करण्यासाठी जलसंपदा विभागाचा प्रयत्न

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील । जवळा येथे कुकडी लाभक्षेत्रातील डाव्या कालव्याच्या नूतनीकरणाचा शुभारंभ



● पारनेर । वीरभूमी – कुकडी प्रकल्पातील पाण्याची तूट भरून काढण्यासाठी अतिरिक्त पाण्याची निर्मिती करावी लागणार आहे. महायुती सरकार त्यादृष्टीने प्रयत्नशील असून, राज्यातील दुष्काळ आता भूतकाळात जाईल, असा विश्वास जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

कुकडी लाभक्षेत्रातील डाव्या कालव्याच्या नूतनीकरणाचा शुभारंभ मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत जवळा येथे करण्यात आला. यावेळी आमदार काशिनाथ दाते, महायुतीचे पदाधिकारी तसेच जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तालुक्यातील गांजी–भोयरे येथे रस्ते विकासकामांचे लोकार्पणही करण्यात आले.

विखे पाटील म्हणाले, पारनेर तालुका दुष्काळमुक्त करण्याचे काम जलसंपदा विभागाच्या माध्यमातून सुरू झाले आहे. यापूर्वी सहा उपसा सिंचन योजनांना मंजुरी देण्यात आली आहे. पाण्याची उपलब्धता होईल, त्या पद्धतीने या सर्व योजना कार्यान्वित करून लाभक्षेत्रातील गावांना सिंचनाचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न आहे.

महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमाच्या माध्यमातून कालव्यांच्या नूतनीकरणाची मोहीम हाती घेण्यात आली आहे. यामुळे कालव्यांचे संरक्षण होण्याबरोबरच पाण्याची गळती थांबवून वहन क्षमता वाढविण्यास मदत होईल. धरणांमधील पाणीसाठवण क्षमता वाढविणे गरजेचे असून, अतिरिक्त पाणी निर्माण करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

महायुती सरकारने ३६ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी आणि वीजबिल माफीचा निर्णय घेतला असून, त्यामुळे शेतकऱ्यांसाठी नवी संधी निर्माण झाली आहे. पारनेर तालुक्यातील ३२०० शेतकऱ्यांना २४ कोटी रुपये मंजूर झाले असल्याची माहिती त्यांनी दिली.

पारनेर सहकारी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या मालकीचा राहिला पाहिजे, ही भूमिका तालुक्यातील शेतकऱ्यांनी यापूर्वीच घ्यायला हवी होती, असे मतही मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केले.

# कचरा व्यवस्थापन, सीना नदी रुंदीकरणावरुन नगर महापालिकेच्या कामकाजावर अंदाज समिती नाराज

## आ. हेमंत पाटील । महसूल व जिल्हा परिषदेच्या कामाचे कौतुक

● पाथर्डी । वीरभूमी– अहिल्यानगर जिल्हा दौऱ्यावर असताना विधिमंडळाच्या अंदाज समितीने तीन दिवस विविध विभागांच्या कामांची पाहणी केली. यामध्ये सर्वाधिक असमाधानकारक काम महापालिकेचे आढळून आले असून, आयुक्तांच्या कामकाजावर समितीने नाराजी व्यक्त केली असल्याची माहिती समितीचे सदस्य आमदार हेमंत पाटील यांनी दिली.



अंदाज समितीचा अहिल्यानगर जिल्हा दौरा आटोपल्यानंतर आमदार हेमंत पाटील पाथर्डीमार्गे नांदेडकडे जात असताना त्यांनी डॉ. बंडूशेठ भांडकर यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी त्यांनी समितीच्या दौऱ्यातील निरीक्षणांची माहिती दिली.

आमदार पाटील म्हणाले, अहिल्यानगर शहरातून दररोज कागदोपत्री दीडशे टन कचरा उचलला जात असल्याचे सांगितले जाते. मात्र, प्रत्यक्षात शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य दिसून आले. त्यामुळे शहर नियमित स्वच्छ ठेवण्याबरोबरच घनकचरा व्यवस्थापन योग्य पद्धतीने होणे गरजेचे आहे.

सीना नदीचे रुंदीकरण, त्यातून काढण्यात आलेला एक लाख घनमीटर गाळ, बांधण्यात आलेली भिंत आणि त्यावर झालेला एकूण खर्च या बाबी संशयास्पद वाटतात. महापालिका आयुक्तांचे कार्यालय मंत्रालयालाही लाजवेल एवढे मोठे आहे. आयुक्तांनी कार्यालयाबाहेर पडून रस्त्यावर उतरून प्रत्यक्ष काम करण्याची गरज आहे, अशी टीका त्यांनी केली. तसेच नगर–मनमाड मार्गाच्या दुरवस्थेबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली.

पोलीस प्रशासनाच्या कामकाजाबाबत भंडारदरा येथील रेव्ह पार्टी, गुटखा नियंत्रण, अवैध वाहतूक तसेच एकूणच गुन्हेगारी रोखण्यासाठी बैठकीत आवश्यक सूचना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

महसूल विभाग आणि जिल्हा परिषदेच्या कामाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. विशेषतः जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या कामाचे कौतुक करताना लोकसहभागातून वृक्षारोपणासह विविध योजना सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम चांगल्या पद्धतीने सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

अहिल्यानगर जिल्हा पर्यटनवाढीसाठी अत्यंत महत्त्वाचा असून, जिल्ह्यात शिर्डी, शनिशिंगणापूर, मोहटादेवी, मढी यांसारखी प्रसिद्ध धार्मिक स्थळे आहेत. तसेच भंडारदरा येथील काजवा महोत्सवासारख्या उपक्रमांचाही जिल्ह्याच्या विकासासाठी प्रभावीपणे उपयोग करून घेण्याचे आवाहन त्यांनी प्रशासकीय यंत्रणेला केले.

### कारवाईकडे जिल्हावासीयांचे लक्ष

■ अंदाज समितीने विविध कामांची पाहणी केल्यानंतर पुढील अधिवेशनात त्याचा सविस्तर अहवाल सादर केला जातो. त्यानंतर सचिव दर्जाचे अधिकारी, महालेखाकार आणि स्थानिक लोकपाल आदी यंत्रणांकडून समितीने नोंदविलेल्या आक्षेपांची तपासणी केली जाते. या तपासणीत दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाते. त्यामुळे आगामी अधिवेशनात समितीकडून कोणता अहवाल सादर केला जाणार आणि कोणावर कारवाईचा बडगा उगारला जाणार, याकडे जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे.

# बुवासाहेब नवले पतसंस्थेच्या ठेवी ३१० कोटींवर

## सभासदांच्या विश्वासामुळे संस्थेची १७६८ कोटींची उलाढाल; ५ टक्के लाभांश देणार : मधुकरराव नवले

● अकोले । वीरभूमी – बुवासाहेब नवले ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था आणि मल्टिस्टेटच्या एकूण ठेवी साडेपाचशे कोटी रुपयांवर गेल्या आहेत. त्यापैकी पतसंस्थेच्या ठेवी ३१० कोटी रुपयांवर पोहोचल्या असून, सभासदांनी संस्थेवर टाकलेल्या विश्वासामुळेच हे शक्य झाले आहे. यंदा संस्थेची उलाढाल १७६८ कोटी रुपयांची झाली असून सभासदांना ५ टक्के लाभांश देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक चेअरमन मधुकरराव नवले यांनी दिली.

बुवासाहेब नवले ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, अकोलेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अकोले येथील महाराजा लॉन्स येथे संस्थेचे संस्थापक चेअरमन मधुकरराव नवले यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी ते बोलत होते.



■ छाया । विद्याचंद्र सातपुते

व्यासपीठावर संस्थेचे व्हाइस चेअरमन रमेश जगताप, ज्येष्ठ नेते कचरू पाटील शेटे, जनलक्ष्मी पतसंस्थेचे चेअरमन भाऊपाटील नवले, लक्ष्मी पतसंस्थेचे चेअरमन प्रवीर मालुंजकर, शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन प्रा. दीपक जोंधळे, स्वामी समर्थ पतसंस्थेच्या चेअरमन मंगळा तळपडे, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, अकोले सोसायटीचे चेअरमन मिलिंद नवले, माजी चेअरमन मारुती नाईकवाडी, ज्येष्ठ नेते आर. डी. चौधरी, माजी सरपंच संपत नाईकवाडी, अगस्ती कारखान्याचे संचालक विलास नवले, माजी संचालक बाळासाहेब ताजने, तसेच संस्थेचे संचालक ॲड. आनंदराव नवले, सौ. प्रतिभा घुले, भास्कर दराडे, रामदास धुमाळ, ॲड. किसन हांडे आदी उपस्थित होते.

नवले म्हणाले, मार्च २०२६ अखेर संस्थेच्या ठेवी २९३ कोटी रुपये होत्या. सध्या त्या ३१० कोटी रुपयांवर पोहोचल्या असून गतवर्षीच्या तुलनेत ठेवींमध्ये २८ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. कर्ज थकबाकीचे प्रमाण ३.११ टक्के असून गतवर्षीच्या तुलनेत त्यात ०.३० टक्क्यांनी घट झाली आहे. संस्थेची मालमत्ता ३० कोटी रुपयांची आहे.

संस्थेची सभासद संख्या १३९४ ने कमी झाली आहे. सोनेतारण कर्ज घेणाऱ्यांना संस्थेचे सभासद केले जाते. कर्जाची परतफेड करून सोने सोडवून नेताना काही सभासदत्व रद्द करतात. यंदा संस्थेच्या उलाढालीत २२३ कोटी रुपयांची वाढ होऊन ती १७६८ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. भागभांडवलातही वाढ झाली आहे. संस्थेला आर्थिक वर्षात ऑडिट वर्ग 'अ' मिळाला आहे, असे त्यांनी सांगितले.

आता आमची स्पर्धा राष्ट्रीयीकृत बँकांशी आहे. संस्थेच्या नफ्यात आणि ठेवींमध्ये दरवर्षी वाढ होत आहे. संचालक मंडळाच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जातील थकबाकीचे प्रमाणही अवघे १.७३ टक्के आहे, असे नवले यांनी नमूद केले.

भाऊपाटील नवले म्हणाले, पतसंस्था चालविताना दररोज नवी आव्हाने असतात. संस्था चालविणे ही तारेवरची कसरत आहे. संस्थांमध्ये तरुणांचा सहभाग वाढविण्याची गरज आहे. त्यांना आवश्यक डिजिटल सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील. सध्याचे तंत्रज्ञान वेगाने बदलत असून त्यात तरुणांचा सहभाग वाढविला पाहिजे. बँकांचा प्रवास एका दिशेने सुरू असताना पतसंस्था ठेवींवर जादा व्याजदर देत आहेत. याचाही गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

सभेच्या प्रारंभी स्वातंत्र्यसैनिक बुवासाहेब नवले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर संस्थेच्या ज्येष्ठ संचालिका स्वर्गीय मंदाताई नवले यांच्यासह आर्थिक वर्षात निधन पावलेल्या सभासद, नेते व सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सभेचे नोटीस वाचन संस्थेचे सरव्यवस्थापक लखन शिंदे यांनी केले, तर गतसभेचे इतिवृत्त वाचन सतीश नवले यांनी केले.

यावेळी संस्थेचे संचालक विठ्ठल धुमाळ, प्रकाश देशमुख, सुजित नवले, दिलीप मंडलिक, शिवाजी चौधरी, भागवत शेटे, अनिल गायकवाड, रामदास शेटे, मुरलीधर शेणकर, गवराम ताजने, सूर्यभान नाईकवाडी, साईनाथ नवले, विक्रम मंडलिक, सौ. संगीताताई चौधरी, सौ. सुनिता तळेकर, भाऊसाहेब झोळेकर, शांताराम काकड, शरद पानसरे यांच्यासह ड. नारायण आरोटे, वसंतराव बाळसराफ, रजनीकांत भांगरे, मदन आंब्रे, यादव नाईकवाडी आदी उपस्थित होते. शेवटी शिवाजी चौधरी यांनी आभार मानले.

# गौतम बँकेच्या ठेवी १७५ कोटींवर; सभासदांचा विश्वास दृढ

## आ. आशुतोष काळे । गौतम सहकारी बँकेची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळी

● कोपरगाव । वीरभूमी – रिझर्व्ह बँक व शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन, कर्जवाटपातील पारदर्शकता आणि प्रभावी कर्जवसुलीच्या बळावर गौतम सहकारी बँकेने सहकार क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सन २०२५-२६ अखेर बँकेच्या ठेवी १४८ कोटी रुपये होत्या. त्यामध्ये सातत्याने वाढ होऊन आजमितीस बँकेच्या ठेवी १७५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्या आहेत. सभासदांचा बँकेवरील विश्वास दिवसेंदिवस दृढ होत असल्याचे हे द्योतक असून, एवढ्या ठेवींवर एवढा नफा कमावणारी गौतम सहकारी बँकेसारखी दुसरी बँक महाराष्ट्रात नाही, असे गौरवोद्गार आमदार आशुतोष काळे यांनी काढले.

सहकारी बँकिंग क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या गौतम सहकारी बँकेची सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार (दि.८) रोजी गौतमनगर येथील बँकेच्या मुख्य कार्यालयातील सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. बँकेचे मार्गदर्शक तथा माजी आमदार अशोकराव काळे आणि आमदार आशुतोष काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सभेच्या अध्यक्षस्थानी बँकेचे चेअरमन संजय आगवण होते.यावेळी सभासदांना मार्गदर्शन करताना आमदार आशुतोष काळे बोलत होते.

गौतम सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र अहमदनगर, नाशिक, ठाणे, पुणे व संभाजीनगर आदी जिल्ह्यांमध्ये असून, नऊ शाखांच्या माध्यमातून छोट्या-मोठ्या व्यावसायिकांसह विविध घटकांच्या आर्थिक गरजा वेळेत पूर्ण करण्याचे काम बँक करीत आहे. आवश्यक कागदपत्रांची योग्य पडताळणी करूनच कर्जवाटप करण्याची पद्धत तसेच कर्जवसुलीवर असलेले विशेष लक्ष यामुळे बँकेचे आर्थिक कामकाज सक्षमपणे सुरू आहे. यावेळी बोलताना आमदार आशुतोष काळे म्हणाले की, मा. खासदार कर्मवीर शंकररावजी काळे साहेबांनी सहकाराची मुहूर्तमेढ रोवून उभ्या केलेल्या सहकारी संस्थांना प्रगतीपथावर नेण्याचे आणि त्यांना नावारूपाला आणण्याचे काम केले. त्यानंतर या सर्व संस्था यशाच्या शिखरावर नेण्याचे काम माजी आमदार अशोकराव काळे यांनी केले असून आजही त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सहकारी संस्था उत्तम पद्धतीने सुरू आहेत.

गौतम बँकेची स्पर्धा खासगी बँकांशी आहे. खासगी बँकांच्या बरोबरीने आपल्या ग्राहकांना सर्व प्रकारच्या आधुनिक सेवा-सुविधा देण्याचा प्रयत्न बँक करीत आहे. खासगी बँकांकडे ग्राहक असतात; मात्र आपल्या बँकेशी सभासदांचे केवळ ग्राहक म्हणून नव्हे, तर आपुलकीचे आणि विश्वासाचे नाते आहे. त्यामुळे सभासदांनी बँकेवर ठेवलेला विश्वास जपणे ही सर्वांची जबाबदारी आहे. बँकेने घालून दिलेल्या शिस्तीचे काटेकोरपणे पालन करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि सहकाराची मूल्ये यांची सांगड घालून गौतम सहकारी बँकेला आणखी प्रगतीच्या उंचीवर घेऊन जा, असा मौलिक सल्लाही आमदार आशुतोष काळे यांनी दिला.



■ छाया । जनार्दन जगताप

प्रास्तविक करतांना प्रशासकीय अधिकारी बापूसाहेब घेमुड यांनी बँकेच्या आर्थिक परिस्थितीचा अहवाल मांडला. ते म्हणाले की, आरबीआयचे कडक नियम, वाढती स्पर्धा आणि आर्थिक आव्हानांना सामोरे जात गौतम बँकेने यावर्षी ऐतिहासिक आणि भक्कम कामगिरी केली आहे. सर्व वित्तीय निकषांचे पालन करून व्यवसायात नवा टप्पा गाठत मिश्र व्यवसाय २०४ कोटीहून २३८ कोटीवर गेला आहे. बँकेकडे १४८ कोटीच्या ठेवी व कर्ज येणे ८९ कोटी ५६ लाख असून बँकेला यावर्षी ढोबळ नफा ०४ कोटी १४ लाख ०६ हजार झालेला आहे. त्यातून सर्व कायदेशीर तरतुदींची पूर्तता करून निव्वळ नफा ०१ कोटी ३५ लाख ४८ हजार झाला आहे. तसेच मागील काही वर्षापासून बँकेचा निव्वळ एनपीए ०% असल्याचे सांगितले. संस्थेचे मार्गदर्श मा.आमदार अशोकराव काळे व आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व महामंडळाच्या माध्यमातून समाजातील गरजू, पात्र व कर्जफेड करणाऱ्या व्यक्तींना सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी व पूर्तता केल्याशिवाय कर्ज देत नाही. सर्व नियमांचे पालन केले जात असल्यामुळे ठेवीमध्ये देखील वाढ होत असून उत्कृष्ठ व्यवस्थापन आणि शिस्तबद्ध कारभाराच्या जोरावर बँकेच्या नफ्यात वाढ होत असल्याचे त्यांनी सांगितले.

सभेच्या अध्यक्षपदाची सुचना राजेंद्र ढोमसे यांनी मांडली त्यास भागीनाथ काळे यांनी अनुमोदन दिले. यावेळी आर्थिक वर्ष २०२५-२६ या आर्थिक वर्षात निधन झालेल्या व्यक्तींना श्रद्धांजलीचा ठराव संचालक दत्तात्रय खेमनर यांनी मांडला.बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण पावडे यांनी विषय पत्रिकेवरील १ ते १६ विषय मांडले त्यास सभासदांनी टाळ्यांच्या गजरात एकमताने मंजुरी दिली.

याप्रसंगी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन प्रवीण शिंदे, संचालक दिलीपराव बोरनारे, सुधाकर रोहोम,सूर्यभान कोळपे, श्रीराम राजेभोसले, डॉ.मच्छिंद्र बर्डे, प्रशांत घुले, सुनील मांजरे, शंकरराव चव्हाण, मनोज जगझाप, दिनार कुदळे, श्रावण आसने, तसेच ज्येष्ठ नेते कारभारी आगवण, विश्वासराव आहेर,ज्ञानदेव मांजरे, बाबासाहेब कोते, सोमनाथ चांदगुडे, सुभाष गाडे, शरद पवार पतसंस्थेचे चेअरमन देवेंद्र रोहमारे, गौतम सहकारी कुक्कुट पालनचे चेअरमन विजय कुलकर्णी, बँकेचे व्हा. चेअरमन विजयराव रक्ताटे, सर्व संचालक मंडळ, व्यवस्थापन मंडळ सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण पावडे, प्रशासकीय अधिकारी बापूसाहेब घेमुड, कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याचे कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनील कोल्हे, पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब पतसंस्थेचे मॅनेजर मंगेश देशमुख, गौतम सहकारी कुक्कुट पालनचे मॅनेजर सुरेश पेटकर, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्टचे कार्यकारी संचालक दौलतराव मोरे, आदी मान्यवर उपस्थित होते.विषयपत्रिका वाचन, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण पावडे, सभेचे सूत्रसंचालन वैभव महाजन यांनी केले तर आभार बँकेचे चेअरमन संजय आगवन यांनी मानले.

# महिला व बालविकास भवनाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते भूमीपूजन

## ‘अहिल्याभवना’तून नारीशक्तीला मिळणार अधिक बळ, महिलांच्या उत्कर्षाला चालना देणारे केंद्र ठरणार : पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील



**● अहिल्यानगर । वीरभूमी –** नारीशक्ती देशाच्या विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असून स्त्री ही सन्मानाचे प्रतीक आहे. मातृशक्तीचे सक्षमीकरण झाल्याशिवाय सर्वांगीण विकास शक्य नाही. महिलांच्या उत्कर्षाचे काम ‘अहिल्याभवना’तून होणार असल्याने या नारीभवनाच्या माध्यमातून नारीशक्तीला बळकटी मिळणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

महिला व बालविकास भवन (अहिल्याभवन) इमारतीच्या भूमीपूजन सोहळ्यात कोनशिलेचे अनावरण केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी आमदार संग्राम जगताप, आमदार श्रीमती मोनिका राजळे, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पुंडलिक महाराज जंगले, महिला व बालकल्याण समिती सभापती श्रीमती बारस्कर यांच्यासह नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जागतिक आदिवासी दिनानिमित्त क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेसही पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त स्वातंत्र्य चळवळीतील हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले.

### अहिल्याभवनासाठी जिल्हा नियोजनमधून १५ कोटींचा निधी

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले की, महिला व बालविकास भवनासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून १५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. देशाच्या विकासामध्ये मातृशक्तीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कोविडच्या काळात अंगणवाडी सेविकांनी केलेले कार्य कौतुकास्पद आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महिलांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजना ग्रामीण भागातील महिलांपर्यंत पोहोचविण्यासोबतच आरोग्यविषयक जनजागृतीचे कामही अंगणवाडी सेविका प्रभावीपणे करत आहेत. महिलांना शेतकऱ्याचा दर्जा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला असून, त्यातून महिला शक्तीचा सन्मान झाला आहे, असेही त्यांनी सांगितले.

### बचतगटांच्या उत्पादनांना ऑनलाइन बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी

बचतगटांच्या उत्पादनांची विक्री केवळ स्टॉलपुरती मर्यादित न ठेवता त्यांना ऑनलाइन प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. महिलांच्या यशोगाथा तयार करून त्या इतर महिलांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. अशा यशोगाथांमुळे समाजात सकारात्मक जागृती निर्माण होईल, असे पालकमंत्री म्हणाले. बालविवाह रोखण्यासाठी सामाजिक जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. बालविवाह रोखणे हे केवळ प्रशासनाचे काम नसून समाजातील प्रत्येकाचे कर्तव्य आहे. सर्वांनी एकत्रित प्रयत्न करून बालविवाहाला हद्दपार करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही डॉ. विखे पाटील यांनी केले.

### अहिल्याभवनातून १४ कार्यालये एकाच छताखाली

आमदार संग्राम जगताप यांनी अहिल्याभवनासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांचे आभार मानले. या इमारतीच्या माध्यमातून महिला व बालविकास विभागाच्या कामाला निश्चितच गती मिळेल. विभागाच्या विविध योजना प्रभावीपणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार मोनिका राजळे म्हणाल्या की, ‘अहिल्याभवना’च्या माध्यमातून शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. जनतेच्या समस्यांना न्याय देण्यासाठी या वास्तूचा प्रभावी उपयोग झाला पाहिजे. इमारत लवकरात लवकर पूर्ण व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. अहिल्यानगर जिल्ह्याला ऐतिहासिक महत्त्व असल्याने जिल्ह्यातील पुरातन वास्तूंचे संवर्धन करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी प्रास्ताविकात सांगितले की, महिला व बालविकास विभागांतर्गत असलेली १४ कार्यालये एकाच छताखाली येणार आहेत. त्यामुळे नागरिकांच्या वेळेची तसेच पैशांची बचत होऊन विविध शासकीय सेवांचा लाभ अधिक सुलभपणे मिळणार आहे.

जिल्ह्यात पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बालविवाहमुक्त अभियानाची सुरुवात करण्यात आली असून, त्यावेळी नागरिकांना बालविवाहमुक्तीची शपथ देण्यात आली होती. हे अभियान अधिक जोमाने राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेत जिल्ह्याने उद्दिष्टापेक्षा अधिक काम केले असून, जिल्ह्यातील २० हजार ६१६ बचतगटांना कर्जवाटप करण्यात आले आहे. प्रतिपालकत्व योजनेत ५४ कोटी रुपयांचे सहाय्य देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

# आनंदधामात २५ हजार भाविकांचा सामूहिक नवकार महामंत्रजाप

## ‘समर्पण चातुर्मास २०२६’ अंतर्गत पाच कोटी नवकार महामंत्राचा संकल्प



■ छाया । अनिल खाटेर

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** ‘नमो अरिहंताणं’ या दिव्य मंत्रघोषाने अहिल्यानगर येथील आनंदधाम परिसर रविवारी भक्ती, श्रद्धा आणि आध्यात्मिक ऊर्जेने भारावून गेला. राष्ट्रसंत आचार्य सम्राट प.पू. श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन तपोभूमीत आयोजित ‘समर्पण चातुर्मास २०२६’ अंतर्गत अर्हम विज्जा प्रणेता उपाध्याय प्रवर पूज्य श्री प्रविणऋषीजी म.सा. यांच्या पावन सान्निध्यात पाच कोटी नवकार महामंत्राचा सामूहिक जाप करण्यात आला. या ऐतिहासिक अनुष्ठानासाठी ३० हजारांहून अधिक भाविक उपस्थित होते.

यावेळी २५ हजारांहून अधिक भाविकांनी एकाच सुरात नवकार महामंत्राचा जाप केल्याने संपूर्ण आनंदधाम परिसर मंत्रमय झाला. सामूहिक मंत्रजापातून विश्वशांती, सकल संघाची सुख–समृद्धी आणि आत्मकल्याणासाठी मंगलकामना करण्यात आली. हजारो भाविकांच्या एकसुरातील मंत्रघोषामुळे परिसरात भक्तिमय व आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले.

या भव्य धार्मिक अनुष्ठानास महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा., पूज्य तीर्थेशऋषीजी म.सा., पूज्य ज्ञानप्रेमविजयजी म.सा., पूज्य आलोकऋषीजी म.सा., महासतीजी पूज्य सत्यप्रभाजी म.सा. तसेच महासतीजी पूज्य अमितज्योतीजी म.सा. यांच्यासह अनेक साधू–साध्वी भगवंतांचे पावन सान्निध्य लाभले.

या आध्यात्मिक सोहळ्यास जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, मध्य प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचे उपसचिव आयएएस सुधीरकुमार कोचर, अहिल्यानगरच्या महापौर ज्योतीताई गाडे, अ‍ॅड. शिवाजीराव काकडे, हर्षदाताई काकडे, उपमहापौर धनंजय जाधव यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

बोरा परिवाराचा विशेष सहभाग ‘समर्पण चातुर्मास’चे मुख्य लाभार्थी मुंबईतील सुप्रसिद्ध उद्योगपती व अहिल्यानगरचे सुपुत्र सौरभ बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाबाई हेमराजजी बोरा, पराग बोरा तसेच संपूर्ण बोरा परिवाराचा आयोजनात विशेष सहभाग राहिला.

कार्यक्रमाच्या नियोजन व व्यवस्थापनासाठी समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी व अभिजीत गांधी यांच्यासह समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले. आचार्यश्रींच्या ध्वनिमुद्रित मंगलपाठाने आध्यात्मिक अनुष्ठानाची सांगता झाली.

# आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी वीरगावच्या डोंगरावर रुजविले हिरवे स्वप्न

## पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण । लावलेली झाडे जगविण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची




■ छाया । विद्याचंद्र सातपुते

**● अकोले । वीरभूमी –** अकोले तालुक्यातील वीरगाव येथे आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे व सचिव डॉ. अनिल रहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज, वीरगाव आणि वीरगाव ग्रामपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने भवानी माता मंदिर परिसरातील डोंगरावर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी आनंदगड शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष तथा अमृतसागर दूध संघाचे व्हाइस चेअरमन रावसाहेब वाकचौरे, सचिव डॉ. अनिल रहाणे, उपसरपंच जयवंत थोरात, ग्रामसेविका नेहे मॅडम, शिवराज वाकचौरे, को–ऑर्डिनेटर विद्याचंद्र सातपुते, प्राचार्य विनोद गिरी, प्रा. अजित येलमामे, प्रा. प्रिया वाघ, प्रा. आकाश डोखे, प्रा. झरेज बागवान, प्रा. पूजा शेळके, प्रा. अनिता पथवे, प्रा. भारती तोरकड, प्रा. योगेश घोलप, ग्रामपंचायत सदस्य गणेश अस्वले, गणेश कुमकर, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

पर्यावरण संरक्षण, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करणे आणि सजीवसृष्टीचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेजच्या वतीने दरवर्षी वृक्षारोपण उपक्रम राबविला जातो. यंदाही विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने या उपक्रमात सहभाग घेत वृक्षारोपण केले.

वृक्षारोपण यशस्वी करण्यासाठी आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेजचे प्रा. अजित येलमामे, प्रा. प्रिया वाघ, प्रा. आकाश डोखे, प्रा. झरेज बागवान, प्रा. पूजा शेळके, प्रा. अनिता पथवे, प्रा. भारती तोरकड, प्रा. योगेश घोलप तसेच वीरगाव ग्रामपंचायतीचे गणेश कुमकर यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

लावण्यात आलेली सर्व झाडे जगविण्याची जबाबदारी वीरगाव ग्रामपंचायतीने स्वीकारली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

वृक्षारोपणानंतर विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी वनभोजनाचा आनंद घेतला. हिरवाईने नटलेल्या निसर्गाच्या सान्निध्यात सुरुची भोजनाचा आस्वाद घेत विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा आनंद द्विगुणित केला.

# आनंदगड संकुलात जागतिक आदिवासी दिन उत्साहात



■ छाया । विद्याचंद्र सातपुते

**● अकोले । वीरभूमी –** तालुक्यातील वीरगाव येथील आंतरभारती रूरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित आनंदगड शैक्षणिक संकुल आणि धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आदिवासी क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा आणि राघोजी भांगरे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संकुलाचे सचिव अनिल रहाणे, संचालिका सुप्रिया वाकचौरे, संचालिका गीता रहाणे, शिवराज वाकचौरे, प्राचार्य किरण चौधरी, अधीक्षक रवींद्र आंबरे, कॅम्पस डायरेक्टर संदीप थोरात, सुपरवायझर सौ. अलका आहेर, पिंगला तोरमल, लक्ष्मण कवडे, देविदास चारुडे, अधीक्षिका सीमा दिघे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी श्रुती अरगडे, वेदांती चव्हाण, विहान सहाणे, हर्षदा धूम, रुग्वेद चव्हाण, अद्विक तरडे, खुशी रोडे आणि योगिनी गायकवाड या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी आदिवासी समाजाचा इतिहास तसेच आदिवासी क्रांतिकारकांच्या शौर्यगाथा उपस्थितांसमोर मांडल्या.

विद्यार्थ्यांनी विविध पारंपरिक आदिवासी नृत्ये सादर करून आदिवासी संस्कृतीचा आगळावेगळा अनुभव उपस्थितांना दिला. संकुलाच्या वतीने भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते.

प्रास्ताविक आरोही बिडगर हिने केले. स्वरा चव्हाण व प्रचिती लांडगे यांनी सूत्रसंचालन केले, तर राजवीर देशमुख याने आभार मानले.

# शेतीकडे उद्योजक म्हणून पाहा; शेतकऱ्यांनी अभियानाचे महत्त्व समजून घ्यावे

## डॉ. शाकीर अली सय्यद । मंगळूर येथे कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत शेतकरी-शास्त्रज्ञ परिसंवाद



■ छाया । अमोल कराळे

**● शेवगाव । वीरभूमी –** केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियानाचे मुख्य उद्दिष्ट देशाला कडधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण करणे हे आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीऐवजी शेती व्यवसायाकडे उद्योजक म्हणून पाहण्याची गरज आहे. कडधान्य पिकांच्या उत्पादनात आत्मनिर्भर होण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या या अभियानाचे महत्त्व शेतकऱ्यांनी समजून घ्यावे, असे आवाहन आयसीएआर–अटारी झोन ८ चे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. शाकीर अली सय्यद यांनी केले.

कृषी विज्ञान केंद्र, दहिगाव ने यांच्या वतीने कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत निरीक्षण भेट व शेतकरी–शास्त्रज्ञ परिसंवादाचे आयोजन मंगळूर, ता. शेवगाव येथे करण्यात आले होते. यावेळी डॉ. सय्यद बोलत होते.

कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. माणिक लाखे, डॉ. चंद्रशेखर गवळी, प्रकाश बहिरट, प्रकाश हिंगे, अनिल देशमुख, मंगळूरचे सरपंच बाळासाहेब विघ्ने, कुशाबा विघ्ने, वांजोळीचे सरपंच आप्पासाहेब खंडागळे, चंद्रकांत झिरपे, शिवाजी येळवंडे, नवनाथ पागिरे, नाना सुद्रीक, किशोर खंडागळे यांच्यासह सहाय्यक कृषी अधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

यावेळी कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख श्यामसुंदर कौशिक यांनी केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती शेतकऱ्यांना दिली. तसेच सध्याच्या परिस्थितीत विविध पिकांमध्ये करावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. प्रगतिशील शेतकऱ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले आणि माजी आमदार चंद्रशेखर घुले यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विज्ञान केंद्र, दहिगाव कार्यरत आहे. केंद्रामार्फत कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत उडीद पिकासाठी वांजोळी, ता. नेवासा येथे ५८.५ एकर क्षेत्रावर ५५ शेतकऱ्यांच्या शेतात, तर तूर पिकासाठी मंगळूर, कोळगाव, ता. शेवगाव तसेच नान्नज व चोभेवाडी, ता. जामखेड येथे २२६ एकर क्षेत्रावर १५७ शेतकऱ्यांच्या शेतात समूह आद्यरेषा पीक प्रात्यक्षिके राबविण्यात आली.

या अभियानांतर्गत शेतकऱ्यांना सुधारित वाणाचे बियाणे, रासायनिक व जैविक बीजप्रक्रियेचे साहित्य, तणनाशके, कीड व रोगनाशके, फेरोमोन सापळे आदी साहित्य देण्यात आले आहे. अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या समूह आद्यरेषा पीक प्रात्यक्षिकांना तज्ज्ञांनी भेट देऊन पाहणी केली.

कार्यक्रमाचे नियोजन केंद्राचे प्रवीण देशमुख, संजय थोटे, गणेश घुले, दत्तात्रय वंजारी, धनंजय भूमकर, सागर ढिसले आणि राम लांडगे यांनी केले. इंजि. राहुल पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर नंदकिशोर दहातोंडे यांनी आभार मानले.

# रॅली, पारंपरिक वाद्यांचा गजर अन् सांस्कृतिक कार्यक्रमांनी अकोल्यात आदिवासी दिनाचा जल्लोष

**● अकोले । वीरभूमी –** अकोले तालुक्यात रविवारी आदिवासी दिनाचा जल्लोष ओसंडून वाहताना दिसला. या निमित्ताने शहरात निघालेल्या विविध रॅलींमध्ये तालुक्यातून आलेले आदिवासी समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. राजकीय नेत्यांनीही या निमित्ताने शक्तिप्रदर्शनाची संधी साधली.

९ ऑगस्ट हा जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा केला जातो. आदिवासीबहुल अकोले तालुक्यात मागील काही वर्षांपासून हा दिवस उत्साहात साजरा केला जात असून, यंदाही विविध कार्यक्रमांनी आदिवासी दिनाची रंगत वाढली.

शहरातील रस्त्यांच्या दुतर्फा आदिवासी दिनाच्या शुभेच्छा देणारे तसेच विविध नेत्यांची छायाचित्रे असलेले फलक लावण्यात आले होते. मिरवणुकीच्या प्रमुख मार्गांवर स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या. आदिवासी समाजाची ओळख सांगणारे झेंडे हाती घेत तरुण सकाळपासूनच शहरात दाखल होत होते. आद्यक्रांतिवीर राघोजी भांगरे यांच्या प्रतिमा असलेले झेंडेही मोठ्या प्रमाणात दिसून आले.

पारंपरिक आदिवासी वेशातील युवती, वैशिष्ट्यपूर्ण टी–शर्ट परिधान केलेले तरुण आणि आदिवासी लोकगीतांच्या ध्वनिफितींमुळे शहरातील वातावरणात उत्साह निर्माण झाला होता. विविध मिरवणुकांमध्ये पारंपरिक वेशातील आदिवासी महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. बँड, पारंपरिक वाद्यांचा गजर, त्यावर तरुणाईने धरलेला ठेका आणि पारंपरिक नृत्यप्रकारांतून आदिवासी संस्कृती व परंपरेचे दर्शन घडले.

शिवसेनेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात गृहराज्यमंत्री योगेश कदम, आमदार अमोल खताळ आणि नुकतेच शिवसेनेत प्रवेश केलेले खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या उपस्थितीत भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीतून जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात आले.

आमदार डॉ. किरण लहामटे मित्र परिवाराच्या वतीने बाजारतळ येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना आमदार डॉ. लहामटे यांनी आदिवासी समाजाच्या सन्मानासाठी आदिवासी दिन साजरा केला जात असल्याचे सांगितले. आदिवासी बांधव हा दिवस सण म्हणून साजरा करतात, असे त्यांनी नमूद केले. आदिवासी तरुणांनी व्यसनांपासून दूर राहावे, गावातील शाळांकडे विशेष लक्ष द्यावे आणि जातीपातीचे राजकारण करू नये, असे आवाहन त्यांनी केले.



■ छाया । विद्याचंद्र सातपुते

देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत आदिवासी क्रांतिकारकांचे मोठे योगदान आहे. मात्र, इतिहासात अशा सर्व क्रांतिकारकांची नोंद आढळत नसल्याची खंत माजी आमदार वैभव पिचड यांनी राजूर येथे आदिवासी दिनाच्या कार्यक्रमात व्यक्त केली.

राजूर येथे काढण्यात आलेल्या मिरवणुकीत विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी पारंपरिक आदिवासी लोककलांचे दर्शन घडविले. आदिवासी विभागातील सर्व शाळांमध्येही आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

देवगाव येथील आद्यक्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या स्मारकास अनेकांनी भेट देऊन अभिवादन केले.

आदिवासी दिनानिमित्त अकोले शहरात मोठी गर्दी झाली होती. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी शहरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

### डीजेच्या आवाजाची पुनरावृत्ती अन् गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचा इशारा

■ राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम आदिवासी दिनाच्या कार्यक्रमासाठी अकोले येथे आले होते. बसस्थानक परिसरात त्यांची उपस्थिती असलेल्या कार्यक्रमात त्यांचे भाषण सुरू असतानाच शेजारून आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी दिनाची मिरवणूक डीजेच्या दणदणाटात सुरू होती. डीजेचा आवाज वाढल्यानंतर ना. कदम यांनी, मी राज्याचा गृहराज्यमंत्री आहे. मी ठरवले तर लगेच आवाज बंद करू शकतो; मात्र आदिवासी दिनाच्या कार्यक्रमाला गालबोट लागू नये म्हणून पोलिसांना आदेश देत नाही, असे सांगत शिवसेनेचा आवाज कोणीही दाबू शकत नाही, असा इशारा आमदार डॉ. किरण लहामटे यांचे नाव न घेता दिला. मागील वर्षी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बाजारतळ येथे सभा सुरू असतानाही कोल्हार–घोटी रस्त्यावरून बसस्थानकाकडे जाणाऱ्या आ. लहामटे यांच्या मिरवणुकीतील डीजेच्या आवाजामुळे काही काळ दस्तुरखुद्द ना. शिंदे यांना भाषण थांबवावे लागले होते. मात्र, त्यावेळी त्यांनी कोणतेही भाष्य केले नव्हते. त्याच घटनेची पुनरावृत्ती यंदा त्यांच्याच पक्षाचे युवा नेते आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या भाषणावेळी झाल्याचे चित्र अकोलेकरांना पाहायला मिळाले.